# झाड

झाड कधी म्हणतं का -

दमलो मी आता
सारखी सावली देऊन
घेईन आता विसावा
जाईन की विरून -

मीही होतो इवलुसा
इवलेसे एक बीज
पाणी ऊन लेऊन
धरले मी बाळसे

खोल खोल जमिनीत
शोधले मी पाणी
फैलावून मुळे माझी
तग धरला मी

माझाच झगडा माझ्याशी
अस्तित्व टिकवण्यासाठी
कळेल का कुणा हे
इतुके नाही सोपे ते

मुळे रोवून वाढत गेलो
ऊन पाऊस वारा
अंगोपांगी शोषत गेलो

लहानाचा मोठा झालो

फांदी फांदी पसरवून
अंगांगी बहरत गेलो
बाल्य सरून तारुण्याची
हिरवाई मिरवत आलो

फुले फळे लगडली
पक्षांनीही घरटी केली
प्रेमिकांच्या कूजनाने
कधी फांदी लाजली

कधी पांथस्थ वाटसरू
सावलीत विसावला
दोन घटका सुखाने
निश्चिंत मनाने झोपला

कधी सावलीत माझ्या
मी एकटाच विसावलो
ग्रीष्माच्या काहिलीत
नकळत स्फुंदलो

स्पंदने ती अंतरीची
आठवात दंगलो
शिशिरात एकटाच
रुदन करत राहिलो

येईल फिरुनी वसंत

ह्या आशेत जगतो
पाखरे आणि प्रेमिकांची
वाट आता पाहतो

वारा शीळ वाजवी
पानोपानी साद घाली
सळसळ वाहे अंतरी
शहारतो मी मनीं

कसे सरतील माझे
साऱ्यांविना दिस आता
नाही म्हणत उगीच
आस अंतरी खरीच
आस अंतरी खरीच ! !

**लीना माटे**

मो. 9819534428

Email - leenashining@gmail.com